वरिष्ठ पोलीस निरीक्षक,खंडणी विरोधी पथक,
पिंपरी चिंचवड आयुक्तालय
पत्ता- भुजबळ चौक, वाकड पोलीस चौकी शेजारी, वाकड पुणे
ई-मेल आयडी – piaec.pcpc-mh@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## प्रेसनोट दिनांक ०४/०८/२०२२

# एमआयडीसी मधील अभियंत्यास खंडणी मागणाऱ्या आरोपीस अटक
# खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा यांची कामगिरी

दि.२१/०७/२०२२ रोजी एमआयडीसी मधील सहाय्यक अभियंता संतोष दत्तात्रय सुवर्णकार हे आफिसमध्ये काम करीत असतांना २०/५३ वाचे सुमारास अज्ञात इसमाने त्यांना फोन करुन, ‘‘उगवता सुर्य जर पहायचा असेल ना, तर १० लाख रुपये कॅश उद्या रेडी ठेव, नाहीतर तुझ्या आयुष्याला फुलस्टॉपच लावुन टाकतो कायमचा‘‘ अशी धमकी देवुन पैश्याची मागणी केल्याने त्यांना त्याबाबत दिलेल्या तक्रारीवरुन पिंपरी पोलीस ठाणे गुरनं. ५८६/२०२२ भादवि कलम ३८७ गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयांचे गांभीर्य लक्षात घेवून वरीष्ठांनी खंडणी विरोधी पथकाला संमातर तपास करणेबाबत आदेश व सुचना दिल्या. त्याअनुषंगाने वरीष्ठ पोलीस निरीक्षक अजय जोगदंड खंडणी विरोधी पथक यांनी स्टाफला सदर गुन्हयाचे तपासाबाबत मार्गदर्शन व सुचना दिल्या. तसेच दिनांक २७/०७/२०२२ रोजी वरीष्ठ पोलीस निरीक्षक मच्छिंद्र पंडीत युनिट-४, अतिरिक्त कार्यभार खंडणी विरोधी पथक यांनी नमूद गुन्हयाचे, पो.हवा. १३९२ कानगुडे यांनी केलेल्या तांत्रिक विश्लेषणाचा आढाव घेवून खंडणी विरोधी पथकातील स्टाफला कारवाई करणे बाबत आदेश दिले.

पो.हवा. १३९२ कानगुडे यांनी केलेल्या तांत्रिक विश्लेषणाचे आधारे पोलीस उप-निरीक्षक रायकर युनिट ४, पो.हवा.१३९२ कानगुडे, पो.हवा. ८५६ मावसकर, पो.ना. १९६१ मगर, पोअंम. २३१३ गायकवाड यांनी दिनांक २८/०७/२०२२ रोजी १४:४५ वा. सापळा लावुन शिताफीने आरोपी रोशन बबन कानकुडे वय- २२ वर्षे, रा. भैरवनाथ मंदीराचे शेजारी, आंबी गाव, ता.मावळ जि.पुणे यास जीसीबी कंपनी गेट नंबर ४ जवळ, तळेगाव एमआयडीसी, पुणे येथून पकडुन, त्याच्याकडे वरिल गुन्हयाबाबत विचारपुस करता, त्याने सदरचा गुन्हा केला असल्याची तोंडी कबुली दिल्याने, त्याने पिंपरी पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नंबर ५८६/२०२२ भादवि कलम ३८७ हा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. नमुद आरोपी कडुन किंमत रुपये ३०,५००/- चे ॲपल कंपनीचा आयफोन 11 व आयटेल ऐसीई कंपनीचा मॉडेल नं. २१६१ असे मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहे. आरोपी रोशन बबन कानकुडे यास पुढील कारवाई कामी पिंपरी पोलीस ठाणे येथे हजर केले आहे.

सदरची कारवाई पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री. अंकुश शिंदे, अपर पोलीस आयुक्त डॉ.श्री.संजय शिंदे, पोलीस उप आयुक्त डॉ.श्री. काकासाहेब डोळे, सहा.पोलीस आयुक्त डॉ.प्रशांत अमृतकर व पद्माकर घनवट यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय जोगदंड, युनिट ४ चे वरीष्ठ पोलीस निरीक्षक मच्छिंद्र पंडीत, पोलीस उप-निरीक्षक रायकर, खंडणी विरोधी पथकातील सहा.पोलीस उप-निरीक्षक अशोक दुधवणे, पोलीस अंमलदार सुनिल कानगुडे, रमेश मावसकर, किरण काटकर, शैलेश मगर, प्रदीप गायकवाड, यांचे पथकाने केली आहे.

(डॉ.काकासाहेब डोळे)
पोलीस उप-आयुक्त,
गुन्हे, पिंपरी-चिंचवड